रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 2
Part XII Section 2
भाग बारा अनुभाग 2

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2 ] | नई दिल्ली, जून 12-18, 2025/ज्येष्ठ 22-28 (शक) 1947 | [खंड 22 |
| No. 2 ] | NEW DELHI, JUNE 12-18, 2025/JYESHTHA 22-28 (SAKA) 1947 | [Vol. 22 |
| अं. २ ] | नवी दिल्ली, जून १२-१८, २०२५/ज्येष्ठ २२-२८ (शके) १९४७ | [खंड २२ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, 1962 ; (2) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, 2005 ; (3) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, 2007 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962 ; (2) The Disaster Management Act, 2005 ; (3) The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, १९६२ ; (२) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, २००५ ; (३) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, २००७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | पेट्रोलियम व खनिज वाहिन्या (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) अधिनियम, १९६२<br>The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962. | ५ |
| २ | आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.<br>The Disaster Management Act, 2005. | १५ |
| ३ | राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था अधिनियम, २००७.<br>The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007. | ४५ |

# पेट्रोलियम व खनिज वाहिन्या (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) अधिनियम, १९६२

## (१९६२ चा अधिनियम क्रमांक ५०)

[१२/८/२०२४ रोजी यथाविद्यमान]

[७ डिसेंबर, १९६२.]

[1][पेट्रोलियम व खनिजे वाहून नेण्यासाठी वाहिन्या टाकण्याकरिता] जमिनीतील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी, संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रयुक्ति.**

**१.** (१) या अधिनियमास, [2][पेट्रोलियम व खनिज वाहिन्या] (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) अधिनियम, १९६२, असे म्हणावे.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य *खेरीजकरून संपूर्ण भारतभर लागू असेल.

(३) तो, प्रथमतः संपूर्ण पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश व गुजरात या राज्यांना व दिल्ली संघ राज्यक्षेत्रास लागू असेल; आणि केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, हा अधिनियम, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य राज्यास किंवा संघ राज्यक्षेत्रास आणि अशा दिनांकापासून [3]लागू असेल, आणि त्यानंतर या अधिनियमाच्या तरतुदी, त्यानुसार त्या राज्यास किंवा संघ राज्यक्षेत्रास लागू होतील.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र सरकारने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी, असा आहे; [4][आणि अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या एकाच क्षेत्रामध्ये किंवा विविध क्षेत्रांमध्ये या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी विविध व्यक्तींना किंवा प्राधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल ;]

(ख) " महामंडळ " याचा अर्थ, कोणत्याही केंद्रीय, प्रांतिक किंवा राज्य अधिनियमान्वये स्थापन केलेला कोणताही निगम निकाय, असा आहे; आणि त्यामध्ये,—

१९५६ चा १. (एक) कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेल्या व नोंदणी केलेल्या कंपनीचा ; आणि

(दोन) भारताच्या कोणत्याही भागामध्ये यापूर्वी अंमलात असलेल्या, कंपन्यांशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन केलेल्या व नोंदणी केलेल्या कंपनीचा,

समावेश होतो ;

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे " पेट्रोलियम वाहिन्या टाकण्याकरिता " याऐवजी दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, " पेट्रोलियम वाहिन्या " याऐवजी दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. हा अधिनियम, अधिसूचना क्र. एस.ओ. आय. १६८९, दिनांक १२ जून, १९६३, **भारताचे राजपत्र,** भाग दोन, अनुभाग ३ (दोन), पृ. १९४५ अन्वये, दिनांक १२ जून, १९६३ पासून आसाम, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, म्हैसूर व राजस्थान या राज्यात, अधिसूचना क्र. एस.ओ. २३८७, दिनांक १६ ऑगस्ट १९६३, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, अनुभाग–३ (दोन), पृ. २७९९ अन्वये, दिनांक १६ ऑगस्ट, १९६३ पासून पंजाब राज्यात आणि अधिसूचना क्र. एस.ओ. ९८७, दिनांक १० मार्च, १९६४, **भारताचे राजपत्र,** भाग दोन, अनुभाग ३ (दोन) पृ. १२१४ अन्वये, दिनांक १५ मार्च, १९६४ पासून ओरिसा, आंध्रप्रदेश व मद्रास या राज्यांत, अंमलात आला आहे.

४. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४(एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

* हा अधिनियम, अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ३९१२ (ई), दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ यान्वये जम्मू व काश्मीर संघ राज्यक्षेत्रास आणि लडाख संघ राज्यक्षेत्रास लागू केला.

[1][(खक) " खनिजे " यांस, खाण अधिनियम, १९५२ यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल, आणि त्यामध्ये, खनिज तेल व संचित वाळू (स्टोविंग सॅन्ड ) यांचा समावेश होतो परंतु, पेट्रोलियमचा समावेश होणार नाही ;] १९५२ चा ३५.

(ग) " पेट्रोलियम " यास, पेट्रोलियम अधिनियम, १९३४ यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल, आणि त्यामध्ये, नैसर्गिक वायू व परिष्करणी (रिफायनरी) वायू यांचा समावेश होतो ; १९३४ चा ३०.

(घ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

**संपादनासाठी अधिसूचना प्रसिद्ध करणे.**

**३.** (१) जेव्हा जेव्हा केंद्र सरकारला, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत पेट्रोलियम [2][किंवा कोणतेही खनिज] वाहून नेण्यासाठी, त्या सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून किंवा महामंडळाकडून वाहिन्या (पाइपलाइन्स) टाकण्यात याव्यात असे आणि अशा वाहिन्या टाकण्याच्या प्रयोजनार्थ, ज्या जमिनीखालून अशा वाहिन्या टाकता येतील अशा कोणत्याही जमिनीतील वापर हक्काचे संपादन करणे आवश्यक आहे असे जनहितार्थ आवश्यक आहे असे दिसून येईल तेव्हा तेव्हा, त्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यातील वापर हक्क संपादित करण्याचा आपला इरादा घोषित करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक अधिसूचनेत, जमिनीचे संक्षिप्त वर्णन देण्यात येईल.

(३) सक्षम प्राधिकारी, अधिसूचनेचा सारांश, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा रीतीने, प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

**प्रवेश करणे, भूमापन करणे, इत्यादींचा अधिकार.**

**४.** कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यावर, पेट्रोलियम [3][किंवा कोणतेही खनिज] वाहून नेण्यासाठी वाहिन्या (पाइपलाइन) टाकण्याचे ज्याने प्रस्तावित केले आहे अशा, केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा महामंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी आणि तिचे सेवक व कामगार यांच्यासाठी,—

(क) अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे व भूमापन करणे आणि ती जमीन समतल करणे ;

(ख) अंतर्मृदेत खोदकाम करणे किंवा विंधन करणे ;

(ग) कामाची उद्देशित रूपरेषा आखणे ;

(घ) खुणा उभारून व चर खोदून असे समतल, सीमा व रेषा चिन्हांकित करणे ;

(ङ) जेथे अन्यथा भूमापन पूर्ण करता येत नसेल आणि जमीन समतल करता येत नसेल आणि सीमा व रेषा चिन्हांकित करता येत नसतील तेथे, कोणतेही उभे पीक, कुंपण किंवा जंगल यांचा कोणताही भाग कापणे व तो भाग मोकळा करणे; आणि

(च) जमिनीखालून वाहिन्या (पाइपलाइन) टाकता येतील किंवा कसे याची खात्री करण्यासाठी आवश्यक अशी इतर सर्व कामे करणे ;

कायदेशीर असेल :

परंतु, या कलमाखालील कोणत्याही अधिकाराचा वापर करताना, अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्तीचा कोणताही सेवक किंवा कामगार हा, अशा जमिनीचे शक्य तितके कमीत कमी नुकसान किंवा हानी होईल, हे पाहील.

**आक्षेपांची सुनावणी करणे.**

**५.** (१) जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कलम ३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत, जमिनीखालून वाहिन्या (पाइपलाइन) टाकण्यास आक्षेप घेता येईल.

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४ (दोन) द्वारे हा खंड समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

(२) पोट-कलम (१) खालील प्रत्येक आक्षेप, सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात करण्यात येईल आणि त्यामध्ये आक्षेपांची कारणे नमूद करण्यात येतील आणि सक्षम प्राधिकारी, आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीला, एकतर व्यक्तिशः किंवा विधि व्यवसायीमार्फत आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि सक्षम प्राधिकाऱ्यास, सर्व आक्षेपांची सुनावणी केल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, कोणतीही असल्यास, आणखी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे, एकतर ते आक्षेप मान्य करता येतील किंवा अमान्य करता येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.

**वापर हक्काच्या संपादनाची घोषणा.**

**६.** (१) जेव्हा कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, सक्षम प्राधिकाऱ्याकडे कोणतेही आक्षेप घेण्यात आले नसतील तेव्हा किंवा जेव्हा सक्षम प्राधिकाऱ्याने, त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये ते आक्षेप अमान्य केले असतील त्या बाबतीत, तो प्राधिकारी, शक्य तितक्या लवकर, [१][त्याने केलेल्या कार्यवाहीच्या अभिलेखासह, आक्षेपांवरील त्याच्या शिफारशींचा अंतर्भाव असणारा एकतर कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेमध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या बाबतीतील अहवाल अथवा अशा जमिनीच्या वेगवेगळ्या तुकड्यांच्या बाबतीतील वेगवेगळे अहवाल, केंद्र सरकारच्या निर्णयार्थ, केंद्र सरकारला] सादर करील आणि असा अहवाल मिळाल्यावर, केंद्र सरकार, [२][पेट्रोलियम किंवा कोणतेही खनिज वाहून नेण्यासाठी कोणतीही वाहिनी (पाईपलाईन) टाकण्याकरिता अशी जमीन आवश्यक आहे, याबाबत खात्री पटली तर,] वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्यासाठी जमिनीतील वापर हक्क संपादन करण्यात यावा, असे **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करील, [३][आणि या कलमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे एक अहवाल किंवा वेगवेगळे अहवाल देण्यात आलेले आहेत किंवा कसे हे लक्षात न घेता, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या वेगवेगळ्या तुकड्यांच्या बाबतीत, वेळोवेळी वेगवेगळ्या घोषणा करता येतील.]

(२) पोट-कलम (१) अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्यावर, [४][त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील] वापर हक्क, सर्व भारांपासून मुक्त स्वरूपात केंद्र सरकारकडे बिनशर्तपणे निहित होतील.

(३) जेव्हा कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये एखादी अधिसचूना काढलेली असेल परंतु, त्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, [५][त्या अधिसूचनेच्या व्याप्तीत असलेल्या जमिनीच्या कोणत्याही तुकड्याच्या बाबतीत या कलमान्वये कोणतीही घोषणा प्रसिद्ध करण्यात आली नसेल] त्या बाबतीत, तो कालावधी संपल्यावर ती अधिसूचना अंमलात असण्याचे बंद होईल.

१९७७ चा १३.

[६][(३क) पेट्रोलियम वाहिन्या (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) सुधारणा अधिनियम, १९७७ याच्या प्रारंभानंतर प्रसिद्ध केलेल्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या व्याप्तीत येणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या बाबतीतील घोषणा, अशा प्रसिद्धीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर केली जाणार नाही.]

(४) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला, त्यास लादण्यास योग्य वाटतील अशा अटी व शर्तींवर, लेखी आदेशाद्वारे, असे निदेश देता येतील की, वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्यासाठी जमिनीतील वापर हक्क, केंद्र सरकारच्या ठायी निहित होण्याऐवजी, एकतर ती घोषणा प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास किंवा त्या निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर दिनांकास वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्याचे प्रस्तावित करणाऱ्या राज्य शासनामध्ये किंवा महामंडळाच्या ठायी निहित होतील आणि त्यानंतर, जमिनीतील असे वापर हक्क, अशा प्रकारे लादलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून, सर्व भारांपासून मुक्त स्वरूपात त्या राज्य शासनाच्या ठायी किंवा, यथास्थिति, महामंडळाच्या ठायी निहित होतील.

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ७ (एक) (क) द्वारे, विवक्षित मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ (एक) (ख) द्वारे, हा मजकूर समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ (एक) (ग) द्वारे, हा मजकूर समाविष्ट केला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७ (दोन) द्वारे, विवक्षित मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ७ (तीन) द्वारे, विवक्षित मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ७ (चार) द्वारे, पोट-कलम ३(क) समाविष्ट केले (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

**केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा महामंडळाने वाहिन्या (पाईपलाईन) टाकणे.**

**७.** (१) जेव्हा कोणत्याही जमिनीतील वापर हक्क, कलम ६ अन्वये केंद्र सरकारच्या ठायी किंवा कोणत्याही राज्य शासनामध्ये किंवा महामंडळाच्या ठायी निहित झाले असतील त्याबाबतीत,—

(एक) केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने किंवा, यथास्थिति, महामंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी आणि त्याच्या सेवकांसाठी व कामगारांसाठी, जमिनीवर प्रवेश करणे व वाहिन्या टाकणे किंवा वाहिन्या टाकण्यासाठी आवश्यक असेल अशी इतर कोणतीही कृती करणे कायदेशीर असेल :

परंतु, कोणतीही वाहिनी (पाईपलाईन),—

(क) जी जमीन, कलम ३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, निवासी प्रयोजनांसाठी वापरली जात होती अशा कोणत्याही जमिनीखालून ;

(ख) ज्या जमिनीवर, उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी कोणतीही कायमस्वरूपी संरचना अस्तित्वात होती अशा कोणत्याही जमिनीखालून ;

(ग) जी जमीन एखाद्या निवासी घराच्या लगत आहे, अशा कोणत्याही जमिनीखालून ; किंवा

(घ) भूपृष्ठापासून एक मीटरपेक्षा कमी नसेल इतकी खोली असलेल्या जमिनीखालून ; [१][****]

टाकण्यात येणार नाही ;

[२][(एक क) पेट्रोलियम वाहून नेण्यासाठी वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्याकरिता, केंद्र सरकारने किंवा अशा राज्य शासनाने किंवा महामंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी, कोणतेही खनिज वाहून नेण्यासाठी वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्याकरिता अशा जमिनीचा वापर करणे कायदेशीर असेल, आणि जेव्हा कोणत्याही जमिनीतील वापर हक्क, कोणतेही खनिज वाहून नेण्यासाठी वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्याकरिता अशा प्रकारे निहित केलेला असेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीसाठी, पेट्रोलियम किंवा इतर कोणतेही खनिज वाहून नेण्यासाठी वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्याकरिता अशा जमिनीचा वापर करणे, कायदेशीर असेल ; आणि]

(दोन) अशा जमिनीचा वापर, केवळ वाहिन्या (पाईपलाईन) टाकण्यासाठी आणि अशा कोणत्याही वाहिन्यांचे (पाईपलाईनचे) परिरक्षण करण्यासाठी, तिची तपासणी करण्यासाठी, दुरुस्ती करण्यासाठी, तिच्यात फेरफार करण्यासाठी किंवा ती हलविण्यासाठी किंवा उपरोक्त कोणत्याही प्रयोजनांकरिता आवश्यक असलेली इतर कोणतीही कृती करण्यासाठी किंवा अशा वाहिन्यांचा (पाईपलाईनचा) उपयोग करण्यासाठी, करण्यात येईल.

(२) जर पोट-कलम (१) च्या खंड (एक) च्या परंतुकाच्या परिच्छेद (ख) किंवा परिच्छेद (ग) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणताही विवाद उद्भवला तर, तो विवाद सक्षम प्राधिकाऱ्याकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

**निरीक्षण, इत्यादीकरिता जमिनीवर प्रवेश करण्याचा अधिकार.**

**८.** कोणत्याही वाहिनीचे (पाईपलाईनचे) परिरक्षण करण्यासाठी, तपासणी करण्यासाठी, दुरुस्ती करण्यासाठी, तिच्यात फेरफार करण्यासाठी किंवा ती हलविण्यासाठी किंवा वाहिन्यांचा (पाईपलाईनचा) उपयोग करण्याकरिता आवश्यक असलेली अन्य कोणतीही कृती करण्यासाठी किंवा पूर्वोक्त कोणत्याही प्रयोजनार्थ, कोणतेही निरीक्षण करण्यासाठी किंवा मोजमाप करण्यासाठी केंद्र सरकारने, राज्य शासनाने किंवा, यथास्थिति, महामंडळाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या जमिनीखालून वाहिनी (पाईपलाईन) टाकण्यात आली आहे त्या जमिनीच्या भोगवटाधारकाला वाजवी नोटीस दिल्यानंतर आवश्यक असतील असे कामगार व सहायक यांसह त्या जमिनीवर प्रवेश करता येईल :

परंतु, जेव्हा आणीबाणीची परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल अशा व्यक्तीची खात्री पटली असेल त्याबाबतीत, अशा नोटीशीची आवश्यकता असणार नाही :

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ८ (एक) द्वारे हा "आणि" शब्द वगळला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) द्वारे खंड (एक क) समाविष्ट केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, या कलमान्वये कोणत्याही अधिकारांचा वापर करताना, अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्तीचा कोणताही कामगार किंवा सहायक, अशा जमिनीला शक्यतोवर कमीतकमी नुकसान किंवा हानी पोहोचेल, असे पाहील.

**जमिनीच्या वापरासंबंधीचे निर्बंध.**

**९.** (१) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये जिच्या बाबतीत घोषणा करण्यात आली आहे त्या जमिनीचा मालक किंवा भोगवटादार, कलम ३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, अशी जमीन ज्या प्रयोजनासाठी वापरली जात होती त्या प्रयोजनासाठी त्या जमिनीचा वापर करण्यास हक्कदार असेल :

परंतु, असा मालक किंवा भोगवटादार, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये घोषणा केल्यानंतर,—

(एक) कोणत्याही इमारतीचे किंवा इतर कोणत्याही संरचनेचे बांधकाम करणार नाही ;

(दोन) कोणताही तलाव, विहीर, जलाशय किंवा धरण बांधणार नाही किंवा त्यांचे खोदकाम करणार नाही ;

(तीन) त्या जमिनीवर कोणतेही झाड लावणार नाही.

(२) ज्या जमिनीखालून कोणतीही वाहिनी (पाईपलाईन) टाकण्यात आली आहे अशा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार, त्या पाईपलाईनचे कोणत्याही रीतीने कोणतेही नुकसान होईल किंवा नुकसान होण्याचा संभव असेल, अशी कोणतीही कृती करणार नाही किंवा कोणतीही कृती करण्यास परवानगी देणार नाही.

[१][(३) जिच्या बाबतीत कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये घोषणा करण्यात आली आहे त्या जमिनीचा मालक किंवा भोगवटादार, जेव्हा त्या जमिनीवर,—

(क) कोणत्याही इमारतीचे किंवा इतर कोणत्याही संरचनेचे बांधकाम करतो; किंवा

(ख) कोणतीही विहीर, तलाव, जलाशय किंवा धरण बांधतो किंवा त्यांचे खोदकाम करतो; किंवा

(ग) कोणतेही झाड लावतो,

त्याबाबतीत, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमेत अशी जमीन स्थित आहे त्या जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयास, सक्षम प्राधिकाऱ्याने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून आणि त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ती इमारत, संरचना, जलाशय, धरण किंवा झाड काढून टाकण्याची किंवा विहीर किंवा तलाव बुजवून टाकण्याची व्यवस्था करील, आणि असा काढून टाकण्याचा किंवा बुजवण्याचा खर्च, अशा खर्चाच्या वसुलीचा आदेश, जणू काही त्या न्यायालयाने दिलेला हुकूमनामा होता, असे समजून त्याच रीतीने अशा मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसुलीयोग्य असेल.]

**नुकसानभरपाई.**

**१०.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीकडून कलम ४, कलम ७ किंवा कलम ८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, ज्या जमिनीखालून वाहिनी (पाईपलाईन) टाकण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा टाकण्यात येत आहे किंवा टाकण्यात आली आहे, त्या जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणतेही नुकसान, हानी किंवा क्षती पोहोचली असेल त्याबाबतीत, केंद्र सरकार, राज्य शासन, किंवा यथास्थिति, महामंडळ, प्रथमतः असे नुकसान, हानी किंवा क्षती याबद्दल, सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल अशी रक्कम, अशा व्यक्तीला नुकसानभरपाईपोटी देण्यास पात्र असेल.

(२) जर पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेली नुकसानभरपाईची रक्कम, कोणत्याही पक्षकाराला स्वीकार्य नसेल तर, पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने, ज्याच्या अधिकारितेच्या सीमेत जमीन किंवा तिचा कोणताही भाग स्थित आहे त्या जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज केल्यावर, त्या जिल्हा न्यायाधीशाकडून नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करण्यात येईल.

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ९ द्वारे हे पोट-कलम (३) समाविष्ट केले (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

(३) सक्षम प्राधिकारी किंवा जिल्हा न्यायाधीश, पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२) अन्वये नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करताना,—

(एक) कलम ४, कलम ७ किंवा कलम ८ खालील अधिकारांचा वापर करताना, कोणतीही असल्यास, जमिनीवरील झाडे किंवा उभी पिके, काढून टाकण्याच्या ;

(दोन) ज्या जमिनीखालून वाहिनी (पाईपलाईन) टाकण्यात आली असेल त्या जमिनीची अशा व्यक्तीची मालकी असणाऱ्या किंवा भोगवट्यात असलेल्या इतर जमिनीपासून तात्पुरती विभागणी करण्याच्या; किंवा

(तीन ) अशा व्यक्तींच्या इतर कोणत्याही मालमत्तेस,—मग ती जंगम असो किंवा स्थावर असो, किंवा मिळकतीस इतर कोणत्याही रीतीने कोणतीही क्षती पोहचण्याच्या,

कारणामुळे जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला पोहोचलेले नुकसान किंवा हानी यथायोग्यपणे विचारात घेईल :

परंतु, नुकसानभरपाई निर्धारित करताना, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर, जमिनीवर केलेली कोणतीही संरचना किंवा इतर सुधारणा विचारात घेतली जाणार नाही.

(४) जेव्हा कोणत्याही जमिनीचा वापर हक्क, केंद्र सरकारच्या ठायी, राज्य शासनाच्या ठायी किंवा महामंडळाच्या ठायी निहित केला असेल त्याबाबतीत, केंद्र सरकार, राज्य शासन, किंवा यथास्थिति, महामंडळ, अशा निहितीकरणाच्या कारणाने त्या जमिनीतील ज्या कोणाचा भोगवट्याचा हक्क ज्या कोणत्याही रीतीने, बाधित झालेला आहे अशा मालकाला व इतर कोणत्याही व्यक्तीला, पोट-कलम (१) अन्वये प्रदेय असलेल्या नुकसानभरपाई व्यतिरिक्त, कोणतीही असल्यास, कलम ३ च्या पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या दिनांकास, त्यास जमिनीच्या बाजारमूल्याच्या दहा टक्के इतकी परिगणित केलेली अतिरिक्त नुकसानभरपाई देण्यास पात्र असेल.

(५) उक्त दिनांकाला असलेले त्या जमिनीचे बाजारमूल्य, सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे निर्धारित करण्यात येईल आणि जर अशा प्रकारे त्या प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेले जमिनीचे मूल्य, पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकारास स्वीकार्य नसेल तर, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जिल्हा न्यायाधीशाकडे पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर, त्या जिल्हा न्यायाधीशाद्वारे निर्धारित करण्यात येईल.

(६) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (५) खालील जिल्हा न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

**नुकसानभरपाई जमा करणे व प्रदान करणे.**

**११.** (१) कलम १० अन्वये निर्धारित केलेली नुकसानभरपाईची रक्कम, विहित करण्यात येईल अशा कालावधीत आणि अशा रीतीने, केंद्र सरकारद्वारे, राज्य शासनाद्वारे किंवा, यथास्थिति, महामंडळाद्वारे सक्षम प्राधिकाऱ्याकडे जमा करण्यात येईल.

(२) जर नुकसानभरपाईची रक्कम पोट-कलम (१) अन्वये विहित केलेल्या कालावधीत जमा केली नाही तर, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा, यथास्थिति, महामंडळ, ज्या दिनांकास नुकसानभरपाईची रक्कम जमा करावयाची होती त्या दिनांकापासून प्रत्यक्ष जमा करण्याच्या दिनांकापर्यंत, दर साल सहा टक्के इतक्या दराने त्यावर व्याज देण्यास पात्र असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये नुकसानभरपाईची रक्कम जमा केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, सक्षम प्राधिकारी, केंद्र सरकार, राज्य शासन किंवा यथास्थिति, महामंडळ यांच्या वतीने, त्यात हक्कदार असलेल्या व्यक्तींना नुकसानभरपाईची रक्कम प्रदान करील.

(४) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये जमा केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेत हितसंबंध असल्याचा अनेक व्यक्ती, दावा करीत असतील त्याबाबतीत, सक्षम प्राधिकारी, त्याच्या मते, ज्या व्यक्ती नुकसानभरपाईची रक्कम मिळण्यास हक्कदार आहेत त्या व्यक्ती आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला प्रदेय असलेली रक्कम, निर्धारित करील.

(५) जर नुकसानभरपाईच्या रकमेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे संविभाजन करण्याच्या संबंधात किंवा ज्यांना ती नुकसानभरपाईची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग प्रदेय आहे अशा व्यक्तीच्या संबंधात, कोणताही विवाद उद्भवला तर, सक्षम प्राधिकारी, तो विवाद, ज्याच्या अधिकारितेच्या सीमेत ती जमीन किंवा तिचा कोणताही भाग स्थित आहे त्या जिल्हा न्यायाधीशाच्या निर्णयार्थ सोपवील आणि त्यावरील जिल्हा न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

**१२.** सक्षम प्राधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना, पुढील बाबींच्या संबंधात, एखाद्या दिवाणी न्यायालयाला जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील :— **सक्षम प्राधिकाऱ्याला दिवाणी न्यायालयाचे विवक्षित अधिकार असणे.**

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढणे आणि उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्ताऐवजाचा शोध घेण्यास आणि तो सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागविणे ;

(ङ) साक्षीदारांची साक्षतपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे.

**१३.** (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेली अधिसूचना यांनुसार, जी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली आहे किंवा करण्याचे उद्देशित आहे, अशा कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. **सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

(२) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेली अधिसूचना यांनुसार, जी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली आहे किंवा करण्याचे उद्देशित आहे, अशा कोणत्याही गोष्टीमुळे झालेले किंवा होण्याचा संभव असलेले कोणतेही नुकसान, हानी किंवा क्षती यांबद्दल, केंद्र सरकार, सक्षम प्राधिकारी, राज्य शासन किंवा महामंडळ यांच्या विरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**१४.** या अधिनियमामध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज दिवाणी न्यायालयास, ज्या बाबीच्या संबंधात सक्षम प्राधिकाऱ्याला या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये निर्णय करण्याचा अधिकार प्रदान केला आहे अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणतीही अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या अनुषंगाने केलेल्या किंवा करण्याचे प्रस्तावित केलेल्या कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाद्वारे किंवा इतर प्राधिकरणाद्वारे कोणताही मनाईहुकूम देण्यात येणार नाही. **दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस रोध.**

[१][**१५.** (१) जो कोणी, कलम ४ किंवा कलम ७ किंवा कलम ८ यांद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही कृती करताना, कोणत्याही व्यक्तीला हेतुपुरस्सर अडथळा आणील अथवा कलम ४ अन्वये उभारलेले कोणतेही चर किंवा कोणतेही चिन्ह हेतुपुरस्सर बुजवील, नष्ट करील, त्याचे नुकसान करील किंवा विस्थापित करील किंवा कलम ९ अन्वये मनाई केलेली कोणतीही कृती हेतुपुरस्सर करील तो, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल. **शास्ती.**

(२) जो कोणी, कलम ७ अन्वये टाकलेल्या कोणत्याही वाहिनीशी (पाईपलाईनशी ) हेतुपुरस्सरपणे कोणतीही अनधिकृत जोडणी करील किंवा ती काढील, नष्ट करील, तिचे नुकसान करील किंवा ती विस्थापित करील किंवा तसे करण्याची व्यवस्था करील अथवा अशा वाहिनीमधून (पाईपलाईनमधून) पेट्रोलियम पदार्थ किंवा खनिजे काढण्यासाठी तीत हेतुपुरस्सरपणे कोणतेही साधन घालील, किंवा त्या वाहिनीमधून करण्यात येणारा पुरवठा हेतुपुरस्सर खंडीत करील, तो, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल, आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस सुद्धा पात्र असेल.

(३) जर पोट-कलम (२) खालील अपराधाबद्दल दोषसिद्ध ठरलेली कोणतीही व्यक्ती, त्याच तरतुदींखालील एखाद्या अपराधाबद्दल पुन्हा दोषसिद्ध ठरली असेल तर, ती व्यक्ती, दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल :

परंतु, न्यायालयास, न्यायनिर्णयात नमूद करावयाच्या कोणत्याही समुचित व विशेष कारणांसाठी तीन वर्षांहून कमी असेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावता येईल.

१. २०१२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २ द्वारे, कलम १५ व १६ यांऐवजी दाखल केले (दिनांक १२ जानेवारी, २०१२ रोजी व तेव्हापासून).

(४) जो कोणी, कलम ७ अन्वये टाकलेल्या कोणत्याही वाहिनीचे (पाईपलाईनचे) नुकसान किंवा नाश करण्याच्या उद्देशाने किंवा आपण तिच्या नुकसानीस किंवा नाशास कारण बनण्याची संभाव्यता आहे, असे माहीत असताना, घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने, किंवा असे कृत्य इतके निकटवर्ती धोकादायक असेल की, ज्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा ज्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून येण्याची संभाव्यता असेल अशी शारीरिक इजा घडून येण्याची सर्व संभाव्यता त्यात असेल याची जाणीव असताना, पेट्रोलियम पदार्थ, कच्चे तेल किंवा गॅस वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहिनीच्या नुकसानीस आगीमुळे स्फोटक पदार्थामुळे किंवा अन्यथा कारणीभूत ठरेल, तो, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, आजीवन कारावासापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासाच्या किंवा मृत्युदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**विवक्षित अपराध दखलपात्र असणे.** **१६.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १५ ची पोट-कलमे (२), (३) व (४) यांखाली मोडणारा अपराध, त्या संहितेच्या अर्थांतर्गत दखलपात्र व अजामीनपात्र असल्याचे मानण्यात येईल. १९७४ चा २.

**विवक्षित प्रकरणी शाबितीचा भार.** **१६क.** जेव्हा कोणताही पेट्रोलियम पदार्थ, कलम ७ अन्वये टाकलेल्या वाहिनीमधून (पाईपलाईनमधून) चोरण्यात आला आहे असा वाजवी विश्वास असताना, कलम १५ च्या पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (४) खालील असा कोणताही अपराध करताना वापरलेले कोणतेही हत्यार, वाहन किंवा कोणतीही वस्तू यांसह असा कोणताही पेट्रोलियम पदार्थ, या अधिनियमान्वये जप्त केला असेल त्याबाबतीत, ती चोरीची मालमत्ता नाही हे शाबीत करण्याची जबाबदारी, जेव्हा अशी जप्ती कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यातून केली असेल तेव्हा,—

(एक) जिच्या ताब्यातून ती मालमत्ता जप्त केली होती त्या व्यक्तीवर; आणि

(दोन) जिच्या ताब्यातून चोरीची मालमत्ता जप्त केली होती त्या व्यक्तीव्यतिरिक्त जी कोणतीही व्यक्ती त्या मालमत्तेची मालक असल्याचा दावा करीत असेल, अशा कोणत्याही व्यक्तीवर,

असेल.

**मालमत्तेसंबंधीचे गृहितक.** **१६ख.** जेव्हा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कार्यवाहीच्या किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या परिणामी, कोणताही पेट्रोलियम पदार्थ महामंडळाची मालमत्ता आहे किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवतो तेव्हा, एतद्‌विरुद्ध दर्शविले नाही तर, न्यायालय, असा पेट्रोलियम पदार्थ, महामंडळाच्या मालकीचा आहे, असे गृहीत धरील.

**जामिनासंबंधीच्या तरतुदी.** **१६ग.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १५ च्या पोट-कलम (४) अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाचा आरोप असलेली व्यक्ती, कोठडीत असेल तर,— १९७४ चा २.

(क) अशा सुटकेच्या अर्जास विरोध करण्याची सरकारी अभियोक्त्याला संधी देण्यात आल्याशिवाय; आणि

(ख) जेव्हा सरकारी अभियोक्त्याने अर्जाला विरोध केला असेल त्याबाबतीत, अशा अपराधाबद्दल ती दोषी नाही असा विश्वास ठेवण्यास वाजवी कारणे आहेत याबाबत, आणि जामिनावर असताना, ती कोणताही अपराध करण्याची शक्यता नाही याबाबत न्यायालयाची खात्री पटल्याशिवाय,

कोणत्याही व्यक्तीला जामिनावर किंवा तिच्या स्वतःच्या बंधपत्रावर सुटका करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जामीन देण्यावरील मर्यादा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याखालील किंवा जामीन मंजूर करण्याबाबत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखालील मर्यादांशिवाय असतील. १९७४ चा २.

(३) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ४३९ अन्वये जामीन देण्यासंबंधीच्या उच्च न्यायालयाच्या विशेष अधिकारांना बाधक असल्याचे मानले जाणार नाही. १९७४ चा २.

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यांचे कलम ४३८ लागू नसणे.** **१६घ.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ४३८ मधील कोणतीही गोष्ट, कलम १५ च्या पोट-कलम (४) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अटकेचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या संबंधात लागू असणार नाही.] १९७४ चा २.

**१७.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या [१][तरतुदींची] अंमलबजावणी करण्यासाठी नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतः व पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ च्या पोट-कलम (३) अन्वये ज्या ठिकाणी व ज्या रीतीने अधिसूचनेचा सारांश प्रसिद्ध करता येईल ती ठिकाणे व ती रीत;

(ख) कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कालावधीत व ज्या रीतीने नुकसानभरपाईची रक्कम जमा करता येईल तो कालावधी व ती रीत.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवण्यात येईल आणि, [२][पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी] जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर, तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाधा येणार नाही.

**१८.** या अधिनियमाच्या तरतुदी, भूमिसंपादनाच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याशिवाय असतील आणि त्यास न्यूनकारी असणार नाही. **इतर कायद्यांची प्रयुक्ति अवरुद्ध नसणे.**

---

१. १९७७ चा अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम १० (एक) द्वारे, विवक्षित मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (दोन) द्वारे, विवक्षित मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल केला (दिनांक ३ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).